नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १९५ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. २४ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## मान्सूनने व्यापला निम्मा महाराष्ट्र

मुंबई : (स. गांवकरी)



राज्यातील मागील दोन आठवड्यापासून एका जागी स्थिर असणाऱ्या मान्सूनने गेल्या चोवीस तासात राज्यातील बहुतांश जिल्ह्यात वाटचाल केली आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली. त्यामुळे पुढील काही दिवसात राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. लवकरच उर्वरित राज्यात मान्सून पुढे सरकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मागील काही दिवसांपासून मान्सूनची उत्तर सीमा दक्षिण कोकणातील हर्णे आणि मध्य महाराष्ट्रातील सोलापूर येथे कायम होती. त्यानंतर मान्सूनचा प्रवास थांबल्याने चिंता व्यक्त करण्यात येत होती. मात्र, सोमवारपासून मान्सून वेगाने पुढे सरकत पुणे आणि रायगड जिल्ह्यातील अलिबागपर्यंत पोहोचला होता. त्यानंतर चोवीस तासात वेगात प्रवास करत मान्सूनने मंगळवारी थेट विदर्भातील वर्धा आणि मुंबईसह पालघर जिल्ह्यातील डहाणूपर्यंत मजल मारत मोठा टप्पा सर केला आहे. यात संपूर्ण मराठवाडा, विदर्भातील काही जिल्हे तसेच मध्य महाराष्ट्रातील बहुतांश भागांचा समावेश आहे. त्यामुळे उष्णतेचा सामना करणाऱ्या उत्तर कोकणासह विदर्भाला दिलासा मिळण्याचा अंदाज आहे.

मान्सूनने मध्य अरबी समुद्र, तेलंगणा, ओडिशा, छत्तीसगड, झारखंड आणि बिहारच्या आणखीन काही भागात प्रवेश केला असल्याची माहिती हवामान विभागाने मंगळवारी दिली आहे.

पुढील २ ते ३ दिवसात राज्यातील उर्वरित भागात मान्सूनची प्रगती होण्यासाठी हवामान स्थिती अनुकूल आहे, असेही हवामान विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, २३ जूनपासून राज्यात मान्सूनची वाटचाल होईल, अशी शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली होती. तसेच कोकण पट्ट्यात पावसाचा जोर हळूहळू वाढताना दिसत असून रत्नागिरीसह काही भागात चांगल्या पावसाची नोंद होत आहे.

## थोडक्यात...

### मानव-वन्यजीव संघर्षावरून संताप

नागपूर (स. गांवकरी) : मानव-वन्यजीव संघर्षाच्या प्रश्नावरून भाजप आमदार तथा माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मंगळवारी विधानसभेत प्रशासनावर जोरदार टीका केली. वाघाच्या हल्ल्यातील पीडितांना वेळेवर निधी न देता त्यांना मंत्रालातील अधिकारी ताटकाळत ठेवतात. अशा अधिकाऱ्यांना एक दिवसाचा कायदा करून झाडाला बांधा आणि वाघ सोडा, म्हणजे त्यांना या संघर्षातील पीडितांची व्यथा कळेल. वाघाच्या हल्ल्यातील पीडितांना वेळेवर निधी न देता त्यांना ताटकाळत ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर निशाणा साधतांना त्यांनी आदित्य ठाकरे यांचे लक्ष वेधले. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, आदित्यजी या अधिकाऱ्यांना सरळ करण्यासाठी आम्हाला तुमच्याच नेत्यांची भाषा वापरावी लागते. संजय राऊत यांच्या शब्दकोषातील भाषा ऐकवल्याशिवाय हे अधिकारी ऐकत नाहीत. त्यामुळे त्यांना वठणीवर आणायचे असेल तर राऊतांच्या शब्दकोषातील भाषा वापरण्याशिवाय आम्हाला पर्याय नसतो. वाघाच्या हल्ल्यातील पीडितांना वेळेवर मदत न देता फाईल रखडवणाऱ्या अधिकाऱ्यांवर माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार प्रचंड संतापले. जोपर्यंत असा कामचुकारपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांना झाडाला बांधत नाही, तोपर्यंत त्यांना परिस्थितीचे गांभीर्य कळणार नाही, असा आक्रमक इशारा त्यांनी दिला. राज्यातला मानव-वन्यजीव संघर्ष तीव्र झाला आहे, पण मुंबईत मंत्रालयात फाईल्स घेऊन बसणाऱ्या अधिकाऱ्यांना याचे गांभीर्य जाणवत नाही.



## नागपूर पोलीस आयुक्तपदी विश्वास नांगरे-पाटील

- डॉ. रविंद्र सिंघल यांची ACBमध्ये बदली
- IPS अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा आदेश

नागपूर : (स. गांवकरी)

नागपूर शहराच्या पोलीस प्रशासनात मोठा प्रशासकीय बदल करत महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने सोमवारी वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. नागपूरचे विद्यमान पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंघल यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी विश्वास नांगरे-पाटील यांची नागपूर शहराच्या नव्या पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या आदेशानुसार, सध्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे (एसीबी) अपर पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत असलेले विश्वास नांगरे-पाटील आता नागपूर शहराचे नवे पोलीस आयुक्त म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. तर विद्यमान पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंघल यांना एसीबीच्या अपर पोलीस महासंचालकपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 मधील कलम 22न अंतर्गत सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीनंतर हा आदेश जारी करण्यात आला आहे. या आदेशानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश पोलीस महासंचालकांना देण्यात आले असल्याचे शासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. विश्वास नांगरे-पाटील हे त्यांच्या धाडसी आणि कर्तव्यदक्ष कार्यशैलीमुळे राज्यभरात विशेष ओळख निर्माण केलेले अधिकारी आहेत. कठोर प्रशासन, गुन्हेगारीविरोधातील प्रभावी कारवाई आणि नागरिकांशी थेट संवाद या गुणांमुळे त्यांची स्वतंत्र ओळख आहे. त्यामुळे त्यांच्या नियुक्तीनंतर नागपूर शहराच्या पोलीस प्रशासनात अधिक गतिमान आणि प्रभावी कार्यपद्धती पाहायला मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, डॉ. रविंद्र कुमार सिंघल यांनी नागपूर शहरातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक संवेदनशील परिस्थितींमध्ये प्रभावी व्यवस्थापन करण्यात आले. आता ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागात नवी जबाबदारी सांभाळणार असून त्या ठिकाणीही त्यांच्या अनुभवाचा फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## बंद शिवभोजन केंद्र सुरू करणार, संख्या वाढवणार : छगन भुजबळ

मुंबई : (स. गांवकरी)



शिवभोजन केंद्रांना व्यावसायिक गॅसचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी शासन सकारात्मक असून, काही कारणांमुळे बंद पडलेली शिवभोजन केंद्रे लवकरच पुन्हा सुरू करण्यात येतील, अशी माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी विधानपरिषदेत दिली.

राज्यातील विशेषतः पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील शिवभोजन केंद्रांना व्यावसायिक गॅस पुरवठा करण्याबाबत उमा खापरे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री भुजबळ यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली. शिवभोजन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. काही ठिकाणी व्यावसायिक गॅस पुरवठ्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र, अशा परिस्थितीतही संबंधित केंद्रांनी पर्यायी व्यवस्था करून लाभार्थ्यांना भोजन उपलब्ध करून दिले असून राज्यातील ४२ पैकी ४१ शिवभोजन केंद्रे नियमितपणे कार्यरत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

ज्या शिवभोजन केंद्रांमध्ये काही काळ गॅस पुरवठ्यामुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या, ती केंद्रे पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे; तसेच ज्या भागांमध्ये सिटी गॅस वितरण व्यवस्था उपलब्ध आहे, तेथील शिवभोजन केंद्रांनी अर्ज केल्यास त्यांना पाइपलाइनद्वारे गॅस पुरवठा उपलब्ध करून देता येईल, असेही त्यांनी नमूद केले. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार घरगुती गॅस पुरवठ्यास प्राधान्य दिले जात आहे. त्यानंतर व्यावसायिक ग्राहकांना पुरवठा केला जात आहे. राज्यातील सर्व शिवभोजन केंद्रांचा कारभार सुरळीत सुरू राहावा यासाठी शासन आवश्यक त्या उपाययोजना करीत आहे; तसेच लाभार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही, असेही मंत्री भुजबळ यांनी स्पष्ट केले.

### बच्चू कडू, प्रसाद लाड यांना उद्धव ठाकरे यांची आठवण

ही योजना शिवसेनेची ओळख असून ती उद्धव ठाकरे यांनी सुरू केली, असे बच्चू कडू यांनी सांगितले. . त्यामुळे राज्यातील गरीब मजूर तसेच अन्य जनतेच्या भोजनाची सोय होत असून या केंद्रांची संख्या वाढविण्यात यावी अशी मागणी केली. त्याचप्रमाणे या केंद्रांसाठी निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी प्रसाद लाड आणि कडू यांच्याकडून करण्यात आली.

## सिया गोयलने १४ जूनलाही केला होता केतनच्या हत्येचा प्रयत्न

पुणे : (स. गांवकरी)



सिया गोयल या तरुणीने तिचा होणारा नवरा केतन अग्रवालला लोहगडावरुन दरीत ढकललं आणि त्याची हत्या केली. या घटनेने पुणे शहरासह संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. सियाने केतन अग्रवाल हा पाय घसरुन दरीत पडला असा बनाव रचला होता. मात्र केतन हा चांगला ट्रेकर होता असं त्याच्या कुटुंबाने सांगितलं आणि सियावर संशय व्यक्त केला. या प्रकरणाचा तपास केल्यानंतर पोलिसांना हे कळलं की सियानेच त्याला धक्का दिला आणि त्याची हत्या केली. या प्रकरणात विविध प्रकारचे खुलासे होत आहेत. सियाने १८ जूनला त्याला धक्का दिला आणि मारलं त्याचा मृतदेह पोलिसांना लोहगडाच्या पश्चिम भागातल्या दरीत आढळून आला. आता अशी माहिती समोर आली आहे की सिया गोयलने १४ जून रोजीही केतनला ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. केतनचे वडील विशाल अग्रवाल यांनीच ही माहिती दिली.

२६ वर्षीय केतन अग्रवाल आणि सिया गोयल यांचं लग्न ठरलं होतं. मात्र केतनची हत्या सियानेच केली. याबाबत केतनचे वडील विशाल अग्रवाल यांनी माहिती दिली. ते म्हणाले १४ जून रोजी सिया केतनला घेऊन लोहगडावर गेली होती. तिथे तिने त्याला धक्का देऊन दरीत ढकलण्याचा प्रयत्न केला. पण केतन झुडुपांमध्ये अडकला आणि वाचला, आपला प्रयत्न फसला आहे हे सियाला लक्षात आलं ज्यानंतर ती लगेच साप आला असं ओरडत केतनच्या जवळ गेली आणि तिने त्याला मिठी मारली.

## रायगड जिल्ह्यात ठाकरे गटाला धक्का

### नगराध्यक्ष ॲड अतुल चौगुले यांचा शिंदे गटात प्रवेश



श्रीवर्धन : (स. गांवकरी)

श्रीवर्धन येथे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाला धक्का बसला असून, ठाकरेंचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या या शहराला आता पक्षांतराचे ग्रहण लागले आहे.ठाकरे यांच्या शिवसेनेच्या तिकीटावर थेट मतदारांकडून विजयी झालेले नगराध्यक्ष अतुल चौगुले यांनी आपल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे.

नगराध्यक्ष ॲड.अतुल चौगुले हे श्रीवर्धनमधील एक तरूण आणि लोकप्रिय नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांनी ठाकरेंच्या शिवसेनेतून निवडणूक लढवून दणदणीत विजय मिळवला होता. मात्र, निवडणुकीनंतर अवघ्या सहा महिन्यांतच त्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे ठाकरे गटाला या भागात मोठे नुकसान सहन करावे लागणार आहे.ठाणे येथील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी चौगुले यांनी हाती 'धनुष्यबाण' घेतले.या पक्षांतरामुळे श्रीवर्धनच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. आगामी काळात श्रीवर्धन तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांवर शिंदे गटाचे वर्चस्व अधिक बळकट होण्याची चिन्हे आहेत. दरम्यान, चौगुलेंचा शिंदे यांच्या शिवसेनेतील प्रवेशामुळे ठाकरेंच्या शिवसेनेत प्रचंड अस्वस्थता पसरली असून काही दिवसातच तालुक्यातील उर्वरित पदाधिकारी व कार्यकर्ते हाती धनुष्यबाण घेणार असल्याच्या वृत्ताने श्रीवर्धन तालुका म्हणजे ठाकरेंच्या शिवसेनेचा बालेकिल्ला ही ओळख पुसण्याचा मार्गावर आहे. असे श्रीवर्धन तालुक्यातील जनतेकडून बोलले जात आहे. डिसेंबर २०२५ साली झालेल्या नगरपरिषद निवडणुकीमध्ये श्रीवर्धन शहरातील मतदारांनी प्रस्थापितांच्या विरोधात जाऊन मला निवडून दिले. श्रीवर्धनच्या जनतेच्या माझ्याकडून काही अपेक्षा आहेत, सदरची अपेक्षा पूर्ण करण्याकरिता सत्तेची कास धरणे आवश्यक आहे.

> श्रीवर्धनच्या भ्रष्टाचार मुक्त विकासाकरिता मी आज शिवसेना शिंदे गटामध्ये प्रवेश करीत आहे. सदर प्रवेश करताना माझी शिवसेना ठाकरे गटाबाबत कोणतीही नाराजी नाही.केवळ श्रीवर्धन च्या सर्वांगीण विकासाकरिता मी शिवसेना शिंदे गटामध्ये प्रवेश करत आहे.
> **– नगराध्यक्ष ॲड.अतुल चौगुले. श्रीवर्धन नगरपरिषद.**



# थोडक्यात पण महत्वाचे



## बीबीएफ तंत्रज्ञान कार्यशाळेला शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात

राजगुरुनगर (स. गांवकरी) : चालू खरीप हंगामामध्ये हवामानातील अनिश्चिततेवर मात करून उत्पादन वाढवण्यासाठी आणि जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. याच पार्श्वभूमीवर खेड तालुका कृषी विभागाच्या वतीने सातकर स्थळ येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत बीबीएफ अर्थात रुंद वरंबा-सरी यंत्राद्वारे पेरणी पद्धतीची थेट प्रात्यक्षिक व मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेला खेड तालुक्यातील सर्व ट्रॅक्टरधारक आणि प्रगतशील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांना प्रास्ताविकाने मार्गदर्शन करताना तालुका कृषी अधिकारी वैभव विश्वे,(खेड) यांनी बीबीएफ तंत्रज्ञानाचे सविस्तर फायदे समजावून सांगितले. चालू खरीप हंगामात सोयाबीन, बटाटा यांसारख्या पिकांसाठी हे तंत्रज्ञान कसे वरदान ठरू शकते, यावर त्यांनी प्रकाश टाकला. तसेच अनिश्चित हवामानात पिकांचे संरक्षण: कमी पाऊस झाल्यास उपलब्ध ओलावा जमिनीत टिकवून ठेवणे आणि अतिवृष्टी झाल्यास सरीद्वारे पाण्याचा सुरक्षित निचरा करून पिकांचे नुकसान टाळणे, हे या तंत्रज्ञानाचे मुख्य वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## उपवर्गीकरणविरोधी लढ्यासाठी हिंदू खाटीक समाज सज्ज : कोतमिरे



सोलापूर (स. गांवकरी) : उपवर्गीकरणविरोधी लढ्यासाठी हिंदू खाटीक समाज सज्ज असल्याची माहिती जेष्ठ वकील अँड अमितकुमार छाया रमेश कोतमिरे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. उपवर्गीकरणविरोधी लढ्यासाठी हिंदू खाटीक समाज सज्ज असल्याची माहिती जेष्ठवकील अँड अमितकुमार छाया रमेश कोतमिरे (महासचिव-- आखिल भारतीय संतुजी ब्रिगेड, महाराष्ट्र राज्य) यांनी दिली. रिपब्लिकन सेना' सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील महामोर्चात सहभागी होणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. अनुसूचित जाती प्रवर्गातील समाजघटकांची एकजूट कायम राखण्यासाठी तसेच समाजाच्या घटनात्मक हक्कांच्या संरक्षणासाठी ३० जून रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या उपवर्गीकरणविरोधी महामोर्चात हिंदू खाटीक समाज मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची घोषणा अखिल भारतीय संतुजी ब्रिगेड हिंदू खाटीक युवा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. रिपब्लिकन सेना सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली हा महामोर्चा मंगळवार, दि. ३० जून रोजी सकाळी ११ वाजता मुंबईतील दीक्षाभूमी ते चैत्यभूमी या मार्गावर काढण्यात येणार आहे. उपवर्गीकरणाच्या प्रस्तावामुळे अनुसूचित जाती समाजातील एकात्मतेला तडा जाण्याची शक्यता असून समाजाच्या हक्क व अधिकारांच्या रक्षणासाठी सर्व घटकांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे संघटनेने म्हटले आहे.



## जय मल्हार विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन संपन्न

अहिल्यानगर (स. गांवकरी) : पिंपळगाव रोठा तालुका पारनेर येथील जय मल्हार विद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन आज विविध योगासने करून संपन्न झाला.याप्रसंगी विद्यालयातील इयत्ता आठवी,नववी व दहावीतील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी विविध योगासने करून आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला. याप्रसंगी खंडू दशरथ साळवे योग प्रशिक्षक व विद्यालयाचा माजी विद्यार्थी, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक उंडे सर,जरांगे सर,केदारी सर तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. योग प्रशिक्षक खंडू साळवे यांनी निरोगी, तणामुक्त आणि संतुलित जीवन जगण्यासाठी मानवी जीवनात योगाची साधना महत्त्वाची आहे म्हणून लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांनी योग करावा असे विषद केले.



## नियमित योगाभ्यास हा निरोगी जीवनाचा मंत्र - ज्ञानदा पवार

■ डॉ.पाऊलबुद्धे तंत्रनिकेतनात जागतिक योग दिन उत्साहात

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर - सोलापूर रोडवरील नारायणडोहो येथील डॉ.ना. ज.पाऊलबुद्धे तंत्रनिकेतनात २१ जून जागतिक योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.ना. ज.पाऊलबुद्धे आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्राध्यापिका श्रीमती ज्ञानदा पवार यांनी योगाचे महत्त्व, त्यामागील शास्त्रीय आधार तसेच दैनंदिन जीवनात योगाचे असलेले स्थान याविषयी मार्गदर्शन केले. नियमित योगाभ्यास केल्यास शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते, तणाव कमी होतो आणि जीवनशैलीशी संबंधित अनेक आजारांपासून संरक्षण मिळते, असे त्यांनी सांगितले. यानंतर आयुर्वेद महाविद्यालयात प्रथम वर्षाला प्रवेशित झालेल्या विद्यार्थिनी सेजल चिकटे व प्रतीक्षा पवार यांनी विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर केले. त्यांनी उपस्थितांना प्रत्यक्ष योगाभ्यास करून घेत विविध आसनांचे फायदे समजावून सांगितले. उपस्थितांनीही उत्साहाने योगासने करून कार्यक्रमात सहभाग नोंदविला. यावेळी तंत्रनिकेतनाचे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे, उपप्राचार्य राजेंद्र देशपांडे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी सामूहिक योगाभ्यास करून निरोगी जीवनासाठी नियमित योग करण्याचा संकल्प केला. जागतिक योग दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून योगाचे महत्त्व अधोरेखित झाले असून निरोगी, संतुलित आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश देण्यात आला.

# शून्यातून विश्व निर्माण करणारे स्वयंभू व्यक्तिमत्त्व : डॉ. अतुलसिंग परदेशी

*यशाचा कोणताही शॉर्टकट नसतो. प्रचंड कष्ट, अथक मेहनत, जिद्द, चिकाटी आणि समाजाप्रती असलेली तळमळ यांच्या जोरावर स्वतःचे वेगळे विश्व निर्माण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे डॉ. अतुलसिंग परदेशी. पत्रकारिता, सामाजिक कार्य, उद्योजकता आणि संघटनात्मक नेतृत्व अशा विविध क्षेत्रांत त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे.*

(स. गांवकरी)



छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात जन्मलेल्या डॉ. अतुलसिंग परदेशी यांची कर्मभूमी ठरली ती शिवजन्मभूमी किल्ले शिवनेरीची पावन भूमी असलेला जुन्नर तालुका. मागील सहा वर्षांपासून ते औद्योगिक नगरी पिंपरी-चिंचवड येथे वास्तव्यास असून पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहेत.

पत्रकारितेची त्यांची वाटचाल २००४ साली प्रिंट मीडियातून सुरू झाली. दैनिक गावकरी, दैनिक पुढारी, दैनिक लोकमत, दैनिक प्रभात आणि दैनिक पुण्यनगरी यांसारख्या प्रतिष्ठित वृत्तपत्रांमध्ये त्यांनी कार्य केले. दहा वर्षांच्या प्रिंट मीडियातील कारकिर्दीत त्यांनी जुन्नर तालुका पत्रकार संघ अध्यक्ष ते पुणे जिल्हा पत्रकार संघ अध्यक्ष अशी महत्त्वपूर्ण पदे भूषविली.

पत्रकारांच्या सुख-दुःखात विश्वासाने उभे राहणारे नेतृत्व म्हणून त्यांनी ओळख निर्माण केली. कला, क्रीडा, सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या विविध विषयांवर त्यांनी प्रभावी लेखन केले. आपल्या सकारात्मक आणि धाडसी पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक वंचित, पीडित आणि सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सन २०१४ मध्ये शिवनेरीच्या पायथ्याशी त्यांनी "आपला आवाज न्यूज नेटवर्क" या इलेक्ट्रॉनिक मीडिया संस्थेची स्थापना केली. "हाक तुमची, साथ आमची" हे ब्रीदवाक्य घेऊन सुरू झालेल्या या माध्यमाने अल्पावधीतच उत्तर पुणे जिल्ह्यात विश्वासार्ह आणि सकारात्मक पत्रकारितेची ओळख निर्माण केली. अन्यायाविरोधात धडक आणि बेधडक भूमिका घेत सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम या माध्यमातून सातत्याने केले गेले. त्यांच्या पत्रकारांप्रती आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांनी त्यांची इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रदेशाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड केली. आज राज्यभरातील पत्रकारांना संघटित करण्यासाठी आणि त्यांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्यासाठी ते सक्रियपणे कार्यरत आहेत.

२०१९ मध्ये त्यांनी आपला आवाज न्यूज नेटवर्कचा विस्तार औद्योगिक नगरी पिंपरी-चिंचवडमध्ये केला. गेल्या सात वर्षांत शहरातील कला, क्रीडा, सामाजिक, साहित्यिक, राजकीय, उद्योजकीय आणि जनहिताच्या विविध क्षेत्रांमध्ये प्रभावी बातमीदारी करत त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली. शहरातील अनेक लोकहिताचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे. पत्रकारितेसोबतच उद्योजकतेच्या क्षेत्रातही त्यांनी यशस्वी पाऊल टाकले. मोठे बंधू दीपेशसिंग परदेशी यांच्या सहकार्याने श्री बालाजी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स या संस्थेच्या माध्यमातून बांधकाम क्षेत्रातही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

आज यशस्वी पत्रकार, संपादक आणि उद्योजक म्हणून ओळख असलेल्या डॉ. अतुलसिंग परदेशी यांचा प्रवास मात्र अत्यंत संघर्षमय राहिला आहे. वडापाव विक्री, पेट्रोल विक्री, माळशेज घाटातील चहाचा स्टॉल, मोबाईल शॉपी अशा अनेक छोट्या-मोठ्या व्यवसायांतून त्यांनी जीवनाचा अनुभव घेतला. या संघर्षातूनच त्यांनी स्वतःचे साम्राज्य उभे केले आणि आज हजारो लोकांसाठी प्रेरणास्थान बनले आहेत. शून्यातून स्वतःचे विश्व निर्माण करणारे, पत्रकारितेला सामाजिक बांधिलकीची जोड देणारे आणि सामान्यांच्या न्यायहक्कासाठी सातत्याने लढणारे डॉ. अतुलसिंग परदेशी यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

त्यांच्या आगामी वाटचालीसाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि उत्तरोत्तर यश लाभो, हीच सदिच्छा.

## पोलिस कर्मचारी नेमण्याची भरत दळवी यांची मागणी!

मुरबाड : (स. गांवकरी)



मुरबाड बस आगार परिसरात वाढती प्रवासी गर्दी आणि वाहतुकीची समस्या लक्षात घेता रहदारी नियंत्रण व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी तात्काळ पोलिस कर्मचारी नेमावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भरत दळवी यांनी मुरबाड पोलीस प्रशासनाकडे केली आहे. सध्या कल्याणसह विविध मार्गांवरून येणाऱ्या बसमध्ये मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी होत असून, दोन दरवाजे असलेल्या बसमध्ये प्रवासी पुढील व मागील दोन्ही दरवाज्यांतून चढण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे उतरणाऱ्या प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत असून अनेकदा वाद निर्माण होत असल्याचे दळवी यांनी पत्रात नमूद केले आहे. याशिवाय बस आगार परिसरात काही व्यसनाधीन व्यक्तींची वर्दळ असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत आहे. तसेच पार्किंगची व्यवस्था नसतानाही काही वाहने बस आगाराच्या आवारात उभी केली जात असल्याने वाहतूक कोंडी वाढत आहे. गर्दीच्या पार्श्वभूमीवर कोणताही अपघात किंवा अनुचित प्रकार घडू नये, प्रवाशांनी शिस्तबद्ध रांगेत बसमध्ये चढावे-उतरावे आणि बस आगारातील व्यवस्थापन सुरळीत राहावे यासाठी किमान दोन पोलिस कर्मचाऱ्यांची तात्काळ नियुक्ती करावी, अशी मागणी भरत दळवी यांनी मुरबाड पोलीस स्टेशनला दिलेल्या निवेदनातून केली आहे.

## नाशिकमध्ये श्री शिवमहापुराण कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद

नाशिक : (स. गांवकरी)



नाशिकच्या पवित्र तपोभूमीत सुरू झालेल्या श्री शिवमहापुराण कथेला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून धर्म, संस्कृती आणि मानवतेचा संदेश देणारा हा महोत्सव ठरत आहे. तपोवन परमहंस आश्रम, टिपकरमाफी विरंगुळा हॉल, टाकळी येथे आयोजित श्री शिवमहापुराण कथा व शिवकथा दीपपूजन सोहळ्यात बोलताना थोर समाजसेवक तथा एन के टी ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष नानजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांनी रामायण, महाभारत, भागवत आणि शिवपुराण यांचे महत्त्व विशद केले. यावेळी बोलताना नानजीभाई ठक्कर म्हणाले की, संपूर्ण हिंदुस्थानातच नव्हे तर जगभरात रामायण, महाभारत, भागवत आणि शिवपुराण यांचा महिमा मोठा आहे. प्रत्येक व्यक्तीने या ग्रंथांचे श्रवण आणि चिंतन करावे. नाशिक ही प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून श्रीरामांनीही येथे महादेवाची भक्ती केली होती. अशा पवित्र भूमीत शिवमहापुराण कथेला प्रारंभ होणे ही भाग्याची गोष्ट आहे.

मानवी जीवनाचा खरा अर्थ समजून घेण्यासाठी शेकडो वर्षांचा इतिहास अभ्यासला पाहिजे. परमेश्वर प्रत्येकाच्या घरी राहू शकत नाही म्हणून त्याने आईचे रूप दिले आहे. त्यामुळे शक्ती आणि भक्तीचे प्रतीक असलेल्या मातृशक्तीचा आदर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील दुष्ट प्रवृत्तींचा नायनाट करण्यासाठी देव-देवतांनी विविध रूपांत अवतार घेतले आणि मानवतेचे रक्षण केले, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी अयोध्या येथील परमपूज्य श्री श्री १००८ स्वामी हरि चैतन्य ब्रह्मचारीजी महाराज यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिवमहापुराण ग्रंथाचे पूजन करण्यात आले. महिलांनी आकर्षक रांगोळ्या, फुलांची सजावट आणि पुष्पहारांनी कार्यक्रमस्थळ भक्तिमय वातावरणाने सजविले. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, समाजसेवक तान्हाजी लामखेडे (मामा), सामाजिक कार्यकर्ते कांतीराम बोराडे, माय माऊली आधार केंद्राचे संस्थापक अध्यक्ष वरुडे पाटील, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र पांडे, माजी प्राचार्य राजेंद्र पुराणिक, रणरागिणी न्यूज चॅनेलच्या संपादिका गायत्री लचके, सामाजिक कार्यकर्ते रामजी पटेल यांच्यासह हजारो भाविक उपस्थित होते. दि. २० जून ते २४ जून २०२६ या कालावधीत परमपूज्य डॉ. संत श्री ब्रुजभूषण बापू यांच्या मार्गदर्शनाखाली शिवमहापुराण कथा सुरू असून नाशिकसह पश्चिम महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्रातील हजारो भाविक या कथेचा लाभ घेत आहेत. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिककरांना शिवमहापुराण कथेसारख्या आध्यात्मिक पर्वाचा लाभ मिळणे ही मोठी भाग्याची बाब असल्याचे सांगितले. वयाच्या ८४ व्या वर्षातही नानजीभाई ठक्कर ठाणावाला सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन जाणे हाच त्यांच्या जीवनकार्याचा मूलमंत्र असल्याचे मान्यवरांनी गौरवोद्गार काढले.

## अशोक भवार यांच्या काव्य मुदिता या संग्रहातील कविता परिवर्तनाच्या, बदलाच्या आणि धम्माच्या आहेत

मुंबई : (स. गांवकरी)




### प्रा. शुक्राचार्य गायकवाड यांचे प्रतिपादन

पांचपीर ट्रस्ट कार्यक्षेत्र भारत यांच्या वतीने आयोजित सार्थक साहित्य प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या कवी अशोक भवार यांच्या ‘काव्यमुदिता’ या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. शुक्राचार्य गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक व विचारवंत नवनाथ रणखांबे होते. यावेळी सार्थक साहित्य प्रकाशनाच्या संचालिका प्रा. आशा नवनाथ रणखांबे, पांचपीर ट्रस्टचे संचालक तथा साहित्यिक शाम परशुराम बैसाणे आणि बौद्ध विकास मंडळ पवईचे अध्यक्ष भाऊ पंडागळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आणि मानवतावादी निमंत्रित कवी संमेलन ज्येष्ठ कवी बबन सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रमणी बुद्धविहार, आयआयटी मेनगेट, पवई येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. शुक्राचार्य गायकवाड यांनी याप्रसंगी बोलताना, "कविता बाहेर येते त्यावेळी ती कविता समाजाची होते. अशोक भवार यांच्या काव्य मुदिता या संग्रहातील कविता परिवर्तनाच्या, बदलाच्या आणि धम्माच्या आहेत." असे गौरव उद्गार काढून उपस्थितांना मार्गदर्शन केले. तर अध्यक्षीय भाषणात साहित्यिक तथा विचारवंत नवनाथ रणखांबे यांनी, "कवी अशोक भवार यांचा काव्य मुदिता कवितासंग्रह बुद्ध, धम्म, समता, करुणा आणि मानवतेचा संदेश देणारा विचारांचा दस्तऐवज आहे. त्यांच्या संवेदनशील लेखणीतून समाजातील वेदना, संघर्ष, प्रेम, नातेसंबंध, स्त्री-सन्मान, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन आणि सामाजिक प्रबोधन यांचे चित्रण झाले आहे," असे गौरवोद्गार काढले. उपस्थित साहित्यिक, कवी आणि रसिकांना मार्गदर्शन करताना रणखांबे पुढे म्हणाले की, "साहित्य हे माणसे जोडणारे असले पाहिजे. लेखक आणि कवींनी कोण काय म्हणेल याचा विचार न करता मानवतावादी, परिवर्तनवादी आणि समाजप्रबोधन करणारे साहित्य निर्माण करावे. दर्जेदार साहित्य नेहमी वाचले जाते. त्यामुळे साहित्यिकांनी स्वतःचा वाचकवर्ग निर्माण करण्यासाठी सातत्याने लेखन, वाचन आणि चिंतन करणे आवश्यक आहे." असे प्रतिपादन करून त्यांनी कवी अशोक भवार यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तर प्रकाशिका प्रा. आशा रणखांबे यावेळी बोलताना म्हणाल्या, "लेखकाच्या विचारांना दर्जेदार पुस्तकाचे रूप देणे ही सार्थक साहित्य प्रकाशनाची बांधिलकी आहे. ‘ना नफा, ना तोटा’ या तत्त्वावर कार्य करत आम्ही साहित्यिकांना गुणवत्तापूर्ण प्रकाशनाची संधी उपलब्ध करून देत आहोत.

## आमदार दातेंच्या आक्रमक भूमिकेनंतर सरकारची भूमिका स्पष्ट

पारनेर : (स. गांवकरी)

राज्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थिती व पशुधनासमोरील चारा टंचाईच्या प्रश्नावर पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी प्रश्नाला उत्तर देताना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. एल निनोच्या प्रभावामुळे राज्यात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता लक्षात घेऊन पशुधनासाठी चारा उपलब्धतेचे नियोजन शासनाने हाती घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मंत्री मुंडे यांनी सांगितले की, राज्यातील संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी वार्षिक योजनेअंतर्गत किमान १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधीची तरतूदही करण्यात येणार आहे. आमदार काशिनाथ दाते यांनी




उपस्थित केलेल्या प्रश्नामध्ये राज्यातील चारा विकास कार्यक्रमासाठी उपलब्ध निधी, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या तरतुदी तसेच चारा बियाण्यांच्या वितरणाबाबत माहिती मागितली होती. त्यास उत्तर देताना मंत्री मुंडे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना ही पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी राबविण्यात येत असून, त्यामध्ये चारा विकास कार्यक्रमाचाही समावेश करण्यात आला आहे.

# सायबर गुन्ह्यांवर सभागृहात आमदार दाते सरांचा घणाघात

### मुख्यमंत्री फडणवीसांनी दिली आकडेवारीसह माहिती

पारनेर : (स. गांवकरी)



राज्यात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर पारनेरचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी प्रश्नामुळे सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांकडे शासनाचे लक्ष वेधले गेले आहे. या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यभरातील सायबर गुन्ह्यांची माहिती देत कठोर कारवाई सुरू असल्याचे स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात सांगितले की, जानेवारी २०२५ ते मे २०२६ या कालावधीत राज्यात सायबर आर्थिक फसवणुकीचे १० हजार ५०५ गुन्हे नोंदविण्यात आले असून २ हजार ३७९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. नागरिकांची आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी विशेष यंत्रणा कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

आमदार काशिनाथ दाते यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील वाढत्या सायबर गुन्ह्यांचा मुद्दा उपस्थित करत नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचे प्रकरण सभागृहात मांडले होते. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्यात २०२५ मध्ये सायबर फसवणुकीच्या ५ हजार १४१ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यामध्ये सुमारे ३७.७६ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे. यातील ७.०२ कोटी रुपयांची रक्कम होल्ड करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

कोपरगाव येथील निवृत्त शासकीय कर्मचाऱ्याची डिजिटल अटकेची भीती दाखवून करण्यात आलेल्या फसवणुकीच्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले आहे. तसेच फसवणुकीतील मोठी रक्कम गोठवून त्यातील काही रक्कम फिर्यादीस परत देण्यात आल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. राज्यातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनाने 'महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प' अधिक सक्षम केला असून राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब आणि विशेष पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून तपास यंत्रणा बळकट करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सायबर हेल्पलाईन १९३०, सोशल मीडियावरील मोहिमा, रेल्वे स्थानकांवरील डिजिटल स्क्रीन आणि विविध माध्यमांतून सायबर सुरक्षा संदेश प्रसारित केले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, आमदार काशिनाथ दाते यांनी वाढत्या सायबर फसवणुकीमुळे सर्वसामान्य नागरिकांची होत असलेली आर्थिक लूट थांबविण्यासाठी अधिक कठोर उपाययोजना, जलद तपास आणि फसवणुकीतील रक्कम पीडितांना परत मिळवून देण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची मागणी सभागृहात केली.

आमदार दाते सरांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नामुळे सायबर गुन्ह्यांचा वाढता धोका पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून नागरिकांनी कोणत्याही अनोळखी लिंक, फोन कॉल किंवा डिजिटल अटकेच्या धमक्यांना बळी न पडण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## नगर पाथर्डी रोडवरील हॉटेल शौर्य येथे तरुणाचा खून; एक जण गंभीर जखमी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर शहरातील पाथर्डी रोडवरील महेशनगर परिसरातील हॉटेल शौर्य येथे रविवारी रात्री झालेल्या हल्ल्यात एका तरुणाचा चाकूने वार करून खून करण्यात झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. सागर धोत्रे व त्यांचा सहकारी हॉटेलमध्ये जेवणासाठी बसले असताना त्यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात सागर धोत्रे यांचा जागीच मृत्यू झाला. तर दुसरा युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर साईदीप हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. प्राथमिक माहितीनुसार, जयेश पाटोळे व त्याच्या दोन साथीदारांनी हा हल्ला केल्याच संशयित आरोपी आहे. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले होते. घटनेची माहिती मिळताच भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर पोलीस उपधीक्षक दिलीप टिपरसे, एपीआय तेजश्री थोरात यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. फॉरेन्सिक पथकानेही घटनास्थळाची तपासणी केली आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. दरम्यान, संशयित आरोपी जयेश पाटोळे याला पोलिसांनी अटक केली असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## अहिल्यानगर जिल्ह्यासाठी २६ जूनपर्यंत 'यलो अलर्ट'

अहिल्यानगर (स. गांवकरी) : भारतीय हवामान खात्याने (IMD) २२ ते २६ जून २०२६ या कालावधीत अहिल्यानगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम पाऊस तसेच सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता वर्तविली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. प्रशासनाने दिलेल्या सूचनांनुसार मेघगर्जना व वादळी वाऱ्याच्या काळात झाडाखाली किंवा उघड्या जागेत थांबू नये. वीज चमकत असताना विद्युत उपकरणांचा वापर टाळावा तसेच ट्रान्सफॉर्मर, वीजवाहिन्या, धातूचे खांब आणि टॉवर्सपासून सुरक्षित अंतर ठेवावे. वादळी वाऱ्यामुळे होर्डिंग्ज किंवा जाहिरात फलक कोसळण्याचा धोका असल्याने अशा ठिकाणांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वीज चमकत असताना मोकळ्या जागेत अडकल्यास खाली बसून स्वतःचे संरक्षण करण्याचा सल्लाही प्रशासनाने दिला आहे. धरणे, नद्या आणि ओढ्यांमध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी.

## रामायण कधीच जुने होत नाही

अहिल्यानगर (स. गांवकरी) : श्रीराम हे केवळ एका युगाचे नायक नसून संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श जीवनमूल्यांचे प्रतीक आहेत. रामायण ही केवळ कथा नसून ती भारतीय संस्कृतीचे जीवन,तत्त्वज्ञान आहे. रामकथा कधीही जुनी होत नाही, कारण प्रत्येक पिढीला ती नवे संस्कार, नवी प्रेरणा आणि जीवन जगण्याची दिशा देत असते. चार वेद, उपनिषदे आणि सनातन संस्कृतीचा अमूल्य वारसा आपल्या समाजाला आजही टिकवून ठेवत आहे, असे प्रतिपादन व्यासपीठ चालक स्वामी अद्वैतानंद सरस्वती यांनी केले. चिन्मय मिशनच्या वतीने आयोजित तुळशी रामायणावर आधारित सुंदरकांड ज्ञानयज्ञाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. या ज्ञानयज्ञाचा शुभारंभ दीपप्रज्वलनाने भक्तिमय वातावरणात झाला. यावेळी स्वामी प्रत्ययानंद सरस्वती, महापौर ज्योतीताई गाडे, चिन्मय मिशनचे अध्यक्ष ॲड. डी.डी. घोरपडे, उपाध्यक्ष विद्याताई हारदे, कोषाध्यक्ष उत्तमराव साळुंखे, सचिव देवराम मोरे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने रामभक्त उपस्थित होते.

# भाजपच्या राऊत यांना सोलापुरातील १२ वा आमदाराचा मान

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक संस्थांमध्ये जिल्हा परिषद व महानगरपालिका प्रत्येकी १ व १७ नगरपरिषद/ नगरपंचायत अशा एकूण १९ संस्था असून त्यातील मतदारसंख्या ५४४ आहे.

सोलापूर विधान परिषद भाजपचे राजेंद्र राऊत विजयी झाले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील १२ वा आमदार होण्याचा मान भाजपाचे राजेंद्र राऊत याना मिळाला आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत एकूण ६१४ मतांपैकी भाजपाचे राजेंद्र राऊत याना ४८३ तर त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी ( श.प. ) पक्षाचे वसंतराव देशमुख याना ११८ मते मिळाली तर १३ मते बाद झाली आहेत. यात राऊत ३६५ मतांनी विजयी झाले आहेत. या निवडणुकीत ३६५ मतांनी



राऊत विजयी झाले आहेत. जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. जिल्ह्यात ११ आमदार विधानसभेचे आहेत. या विजयाने जिल्ह्यातील १२ वा आमदाराचा मान राऊत याना मिळाला आहे. सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक संस्थांमध्ये जिल्हा परिषद व महानगरपालिका प्रत्येकी १ व १७ नगरपरिषद/ नगरपंचायत अशा एकूण १९ संस्था असून त्यातील मतदारसंख्या ५४४ आहे. याशिवाय ४९ नामनिर्देशित व २३ अध्यक्ष मिळून एकूण मतदारसंख्या ६१६ इतकी आहे. मात्र एक नगरसेवक मृत्यू झाला. त्यामुळे ६१५ मतदारांची संख्या झाली. मतदानासाठी जिल्ह्यात एकूण ६ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली. कुर्डूवाडी येथे ८० मतदार, उत्तर सोलापूर येथे १८८ मतदार, दक्षिण सोलापूर येथे ८९ मतदार, पंढरपूर येथे १००, मंगळवेढा येथे ६२ व अकलूज येथे ९७ मतदार आहे. यात मतदानाच्या दिवशी एक नगरसेवक परदेशात असल्याने मतदानापासून वंचित राहिला. त्यामुळे ६१४ मतदारांनी मतदान केले. या निवडणुकीत सुरवातीपासून भाजपने विजयाचा दावा केला होता. जिल्ह्यातील नगर पालिका, महापालिका, जिल्हा परिषद या निवडणुकीत भाजपाने बहुमत घेतले. त्यामुळे एकट्या भाजपाची संख्या ३०७ आहे. तर महायुती मधील घटक पक्ष असलेले शिवसेना ( शिंदे ) व राष्ट्रवादी ( अ.प. ) पक्षाची मते सोबत होती. या शिवाय भाजपाच्या उमेदवाराला राष्ट्रवादी ( श.प. ) पक्षाचे करमाळा,माढा आणि माळशिरस येथील आमदार तसेच सांगोल्याचे शेकापच्या आमदारांनी पाठिंबा दिला. तसेच जिल्ह्यातील स्थानिक आघाडीने देखील पाठिंबा दिल्याने भाजपाचे पारडे जड झाले. मात्र माढा मतदारसंघाचे राष्ट्रवादी ( श.प. ) पक्षाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी पालकमंत्री गोरे, निधी वाटप, भाजपा विरोधी वातावरण असे मुद्दे घेवून निवडणुकीत चुरस निर्माण केली. अदृश्य शक्तीचा पाठिंबा आहे.

### सर्वांना सोबत घेवून जिल्ह्याचा विकास करू – राऊत

सर्व नगरसेवक,नगरसेविका,सदस्य यांनी भाजपा आणि माझ्यावर विश्वास दाखवला. तसेच पालकमंत्री गोरे व भाजपा सह मित्र पक्षाचे सहकार्य मिळाले त्यांचे आभार मानतो. जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वांना सोबत घेवून काम करू अशी प्रतिक्रिया निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्या नंतर भाजपाचे राजेंद्र राऊत यांनी दिली.

निवडणुकीत चमत्कार होईल असा विश्वास देखील खासदार मोहिते यांनी व्यक्त केला. तर भाजपाने विशेष करून पालकमंत्री गोरे यांनी याही निवडणुकीत गाफील न राहता निवडणुकीचे सूक्ष्म नियोजन केले. स्थानिक आघाडी , नाराजी निधी वाटपा संदर्भातील तक्रारी या सर्वांची दखल घेत तातडीने सोडविण्याचे वचन दिले आहे. त्यामुळे भाजपाचा विजय निश्चित आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून आब कि बार पाच सो पार आसा नारा दिला. दरम्यान, मतमोजणीला सुरवात झाल्यावर भाजपाचे राऊत यांनी आघाडी घेत विजय मिळवला. विजया नंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. एकंदरीत जिल्ह्यात या विजयासह भाजपचे ६, राष्ट्रवादी ( श.प. ) पक्षाचे ४ , सांगोला – शेकाप तर शिवसेना ( उ.ठा ) पक्षाचे १ असे १२ आमदार आहेत.

# यांची जहागिरी संपली, सोलापूरच्या जनतेने उत्तर दिलं

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर विधान परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या राजेंद्र राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वसंत नाना देशमुख यांना धूळ चारली. या या निवडणुकीत मोहिते पाटील विरुद्ध पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी असाच सामना रंगल्याचे पाहायला मिळाले. एकमेकांवर वैयक्तिक पातळीवर टीका सुद्धा झाली. उमेदवार वसंतराव देशमुख यांच्या वतीने खासदार धर्यशील मोहिते पाटील यांनी आव्हान दिले होते. निवडणूक लागलेल्या दिवशीच आमदार सचिन कल्याण शेट्टी यांनी मोहिते पाटलांचे नाव न घेता ज्यांच्यामुळे ही निवडणूक लागली त्यांना आम्ही धडा शिकवू अशी भाषा केली होती. त्यानंतर मतदानाच्या दिवशी प्रतिक्रिया देताना सचिन कल्याणशेट्टी यांनी विरोधकांवर अदृश्य होण्याची वेळ आली त्यांचा इगो या निवडणुकीनंतर संपून जाईल सिद्धेश मोहिते पाटलांना आव्हान दिले होते.

यावर आधारित मोहिते पाटील यांनी आमदार कल्याणशेट्टी यांच्यावर बोचरी टीका करताना ते राजकारणात लहान आहेत, लहान मुलांच्या तोंडून असे शब्द निघून जातात अशा शब्दात तोंड सुख घेतले होते. दरम्यान राजेंद्र राऊत यांचा विजय झाल्यानंतर



■ आमदार सचिन कल्याणशेट्टींचे मोहितेंना उत्तर, म्हेत्रेंबद्दल मोठे वक्तव्य

विजय जल्लोष करताना आमदार कल्याण शेट्टी यांनी प्रतिक्रिया दिली विरोधकांची जहागिरी आता संपली आहे, त्यांच्या इगो ला या जनतेने जागा दाखवून दिले आहे. हे लोक अजूनही सरंजामशाही, वतनदार, जहागिरशाही अन् मालकीच्या भूमिकेत आहेत, यांना वाटले की मालकी आमच्या आहे पण या जिल्ह्यातील जनतेने त्यांची जागा दाखवली आता कुठलीही जागीरदारी राहिलेली नाही ही लोकशाही आहे. दरम्यान अक्कलकोट तालुक्यातील म्हेत्रे -कल्याणशेट्टी नवे पर्व सुरू होणार का? यावर त्यांनी कल्याणशेट्टी आणि म्हेत्रे यांचे पर्व सुरू होईल का माहित नाही, पण हे भारतीय जनता पार्टी आणि महायुतीचे यश आहे माझा पक्ष आणि माझा नेता जिथे जिथे महायुती सोबत राहायला सांगतील, तिथे आम्ही सोबत राहू, जे जे प्रामाणिक असतील त्यांना सोबत घेऊन जाऊ अशी प्रतिक्रिया दिली.

# सरकारने हिंदू मुस्लिम वाद निर्माण केला : खासदार निलेश लंके

## पारनेरमध्ये भव्य शेतकरी आक्रोश मोर्चा; कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी तहसील कार्यालयावर धडक

■ ट्रॅक्टर बैलगाडया व मेंढ्या जनावरांसह शेतकरी घुसले तहसील मध्ये

■ आंदोलनादरम्यान जोरदार पावसाची हजेरी

पारनेर : (स. गांवकरी)

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने तातडीने लक्ष दिले नाही तर राज्यभर जनआक्रोशाचा वणवा पेटल्याशिवाय राहणार नाही. सरसकट कर्जमाफी, कांदा-दूध उत्पादकांना न्याय, अतिवृष्टीग्रस्तांना त्वरित मदत, लोडशेडिंग बंद आणि वाढत्या महागाईवर नियंत्रण या आमच्या प्रमुख मागण्या आहेत. या सरकारने हिंदू-मुस्लिम किंवा जातीय वाद निर्माण करून जनतेचे प्रश्न दडपण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. दोन दिवसांत अतिवृष्टीची मदत वितरित करा, अन्यथा शेतकऱ्यांच्या हक्कासाठी मंत्रालयात घुसूनही आंदोलन करण्यास आम्ही मागेपुढे पाहणार नाही. असे स्पष्ट मत खासदार निलेश लंके यांनी पारनेर तहसील येथे सर्वपक्षीय आंदोलनात बोलताना व्यक्त केले. शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मंगळवारी पारनेर तहसील येथे येथे भव्य शेतकरी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चात जिल्ह्यातील व



### आंदोलनात पावसाची हजेरी

पारनेर येथे सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले या आंदोलनामध्ये मोठ्या प्रमाणात ट्रॅक्टर तसेच जनावरे आणण्यात आली होती आंदोलनामध्ये शेतकरी तालुक्यातून मोठ्या संख्येने सहभागी झाला होता सर्वपक्षीय पदाधिकारी सहभागी झाली होते आंदोलन मध्ये मोठमोठ्या घोषणा देण्यात आल्या आंदोलन सुरू असतानाच पारनेर तहसीलवर पावसाने हजेरी लावली

तालुक्यातील विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, शेतकरी संघटना तसेच मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. तहसील कार्यालयासमोर झालेल्या या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. त्यामध्ये पावसाने हजेरी लावली. आंदोलनात खासदार निलेश लंके यांच्यासह भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर, बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब तरटे, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाउपाध्यक्ष अर्जुन भालेकर, रा. या. औटी, शिवसेना नेते भास्कर शिरोळे, जेष्ठ नेते मारुती रेपाळे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संभाजी रोहकले, ॲड राहुल झावरे, मनसेचे तालुकाध्यक्ष अविनाश पवार, माजी सरपंच सतिष पिंपकर, माजी सरपंच ठकाराम लंके, युवा सेना तालुकाप्रमुख अनिल शेटे, दीपक लंके, प्रवक्ते मोहनराव रोकडे, दिपक नाईक, विद्यार्थी नेते जितेश सरडे, सरपंच प्रकाश गाजरे,किरण ठुबे, गुंडा भोसले, रवींद्र राजदेव, डॉ. बाळासाहेब कावरे, बापू शिर्के, नितीन अडसूळ अभयसिंह नांगरे, बाळासाहेब पुंडे, अमोल यादव, योगेश मते बाळासाहेब खिलारी चंद्रभान ठुबे, अमोल उगले, गणेश तांबे, अमित जाधव, महेंद्र पांढरकर, योगेश मते, बाजीराव कारखिले, अमोल ठुबे, संदीप मते, दत्तात्रय साळुंके, जालिंदर लंके, संतोष थोरात, बाळासाहेब दिघे, डॉ. सादिक राजे, सुभाष शिंदे, पोपट गुंड, लखन ठाणगे, रवींद्र गायखे, महादेव म्हस्के, भाऊ चौरे, विशाल गागरे, आदी निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी तसेच भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे पदाधिकारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी काँग्रेसचे पदाधिकारी मनसेचे पदाधिकारी शिवसेनेचे पदाधिकारी व तालुक्यातून शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने आंदोलनात उपस्थित होते.

मोर्चेकऱ्यांनी राज्यातील सर्व शेतकऱ्यांना कोणतीही अट व शर्ती न लावता सरसकट कर्जमाफी जाहीर करण्याची प्रमुख मागणी केली.

पारनेर येथील प्रशासकीय कार्यालयांमध्ये अनेक एजंट तयार झाले आहेत ते खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा खिसा कापण्याचे काम करत आहे. अशा एजंट लोकांवर कारवाई होण्याची गरज आहे या एजंट च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात सेटलमेंट चालते यामुळे शेतकरी वर्गाचीच व ग्रामस्थांची खऱ्या अर्थाने मोठ्या प्रमाणात लूट होत आहे. या एजंट लोकांना तहसील व पोलीस स्टेशन परिसरामध्ये फिरण्यास बंदी करा

- गंगाराम बेलकर (सभापती, पारनेर)

# चैतन्य विद्यालयात गुणवंतांचा गुणगौरव



ओतूर ता. जुन्नर येथील चैतन्य विद्यालयात गुणवंतांचा गुणगौरव प्रसंगी उपस्थित मान्यवर, शिक्षक व विद्यार्थी.

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील ग्राम विकास मंडळ संचलित चैतन्य विद्यालयात मार्च २०२६ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत शेकडा ९० पेक्षा जास्त गुण मिळवलेल्या २८ विद्यार्थ्यांचा व स्पर्धा परीक्षेद्वारे केंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती झालेल्या शिक्षकांचा गुणगौरव समारंभ ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष अनिल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतिक अकोलकर यांनी दिली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रभाकर तांबे, रघुनाथ तांबे, छबुराव तांबे, इंदूमती डुंबरे, सीमा तांबे , छबुराव थोरात,प्रतीक अकोलकर यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा मेडल देऊन व पेढा भरवून अभिनंदन करण्यात आले.

स्पर्धा परीक्षेद्वारे केंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती झालेल्या सुदेष्णा सर्जेराव गाढवे व मनोहर वामन तसेच दक्षिण आफ्रिकेमध्ये अल्ट्रामॅरेथॉन स्पर्धेत चांगली कामगिरी केल्याबद्दल अमोल तांबे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी ग्राम विकास मंडळ ओतूरचे खजिनदार रघुनाथ तांबे, मनोहर वामन, सुदेष्णा गाढवे, जयश्री डुंबरे, विद्यार्थिनी अनुश्री तांबे यांनी आपल्या मनोगतात विद्यालयाबद्दल गौरव उद्गार काढले.

ग्राम विकास मंडळाचे माजी खजिनदार स्वर्गीय भिमसिंग डुंबरे गुरुजी यांचे स्मरणार्थ श्रीमती इंदुमती भीमसिंग डुंबरे यांनी एसएससी परीक्षेतील प्रथम पाच क्रमांकांना साडेपाच हजार रुपये रोख बक्षीस दिले. तसेच सौ. विमलताई सुरेश डुंबरे यांनी पहिल्या पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी १२०० रुपये किमतीची सहा हजार रुपयांची महापुरुषांच्या चरित्राचा आठ पुस्तकांचा संच सप्रेम भेट दिला. जयश्री जीवन डुंबरे यांनी संघर्ष कन्या संस्कृती सुनील बारे हिला रोख ११०० रुपयांचे पारितोषिक दिले. विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक छबुराव थोरात यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी व पालक यांना पेढा देऊन सर्वांचे तोंड गोड केले.

केंद्रप्रमुख सुदेष्णा सर्जेराव सर्जेराव गाढवे व प्रसिद्ध शिल्पकार यतिन शेटे यांनी डिजिटल स्कूलसाठी अनुकमे प्रत्येकी ५०००/- व २५००/- रुपयांची आर्थिक मदत विद्यालयास दिली. पुढील वर्षापासून विद्यालयात दहावीच्या परीक्षेत प्रथम दहा येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सिताराम डुंबरे, सीमा अनिल तांबे, नितीन गुलाबराव डुंबरे यांनी रोख बक्षीसे जाहीर करण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी ग्राम विकास मंडळ ओतूरचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे,रघुनाथ तांबे, पंकज घोलप ,प्रकाश डुंबरे, नितीन तांबे, अमोल डुंबरे, छबुराव तांबे ,सिताराम डुंबरे, अनिल उकिरडे, संजय हिरे, मेघा तांबे, भाग्यश्री , जयश्री डुंबरे ,शिल्पा पानसरे, सारिका शेटे,ललिता थोरात, कोमल बारे, वनिता उकिरडे, रेश्मा तांबे, पल्लवी दिघे, सुनिल पंडोरे ,प्रशांत तांबे, मनोहर वामन, नवनाथ बोरुडे, रवींद्र ढमाले, गोरक्ष शिंगोटे, विठ्ठल पानसरे, दीपक फापाळे, देविदास रगतवान, नितीन डुंबरे, यतीन शेटे, सचिन बारे, लक्ष्मण टिकेकर, संतोष उकिरडे, अनिल तांबे, संपत तांबे, योगेश शेटे, शिवाजी थोरात आदी पालक, शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थी बक्षीस वाटप नियोजन भाऊसाहेब खाडे, मिलिंद खेत्री, अमित झरेकर,ईश्वर ढमाले, प्रसन्न तांबे,अरविंद आंबरे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कांबळे व प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी केले.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/७६/२०२६ — अकोले दि.२२/०६/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. सुभाष रघुनाथ आगिवले, रा.समशेरपुर**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांचा मुलगी कु. ऐश्वर्या सुभाष आगिवले हिचा जन्म दि. २५/१२/२०२० रोजी समशेरपुर** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **समशेरपुर**, ता. अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. सुभाष रघुनाथ आगिवले, रा.समशेरपुर**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा मुलगी कु. ऐश्वर्या सुभाष आगिवले हिचा जन्म दि. २५/१२/२०२० रोजी समशेरपुर** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **समशेरपुर**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २२/०६/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३१/२०२६ — अकोले दि. १९/०६/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. भाऊसाहेब सावळेराम कातोरे, रा.मुथाळणे**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांचे वडील कै. सावळेराम रामा उर्फ रामराव कातोरे यांचा मृत्यू दि. १०/११/२००९** रोजी **मौजे मुथाळणे** येथे झाला असुन त्यांच्या **वडीलांच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मुथाळणे**, ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. भाऊसाहेब सावळेराम कातोरे, रा.मुथाळणे**, ता.अकोले जि.अहिल्यानगर **अर्जदार यांचे वडील कै. सावळेराम रामा उर्फ रामराव कातोरे यांचा मृत्यू दि. १०/११/२००९** रोजी **मौजे मुथाळणे** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मुथाळणे**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १९/०६/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळणेचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २१(१) अन्वये

### हितसंबंधितांना जाहीर नोटीस

भूसंपादन क्रमांक भुसं/कार्या/का.वि./६/६८०/२०२६ मौजे कोऱ्हाळे तालुका– राहाता जिल्हा अहिल्यानगर येथील जमिन निळवंडे– कौठे कमळेश्वर– काकडी– नांदुर्खी (प्रजिमा–१०) रस्त्याचे चौपदरीकरणासाठी भूसंपादन या प्रयोजनासाठी भूसंपादनाची कार्यवाही या कार्यालयामार्फत सुरु आहे. जमिन संपादनाची घोषणा कलम १९ अधिसूचना घोषणा महाराष्ट्र शासन राजपत्र भाग–एक नाशिक विभागीय पुरवणी–१ मध्ये दिनांक १८ जून २०२६ यात पृष्ट क्रमांक ०७ ते ०९ यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे संकेतस्थळावर दि. ०९ जून २०२६, व दोन दैनिके १) पुढारी २) नवा मराठा यात दि. ११ जून २०२६, यामध्ये व तसेच तलाठी व ग्रामसेवक यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर दि. ०८/०६/२०२६, तहसिल कार्यालय राहाता दि. ०८/०६/२०२६ व भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शिर्डी यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर दि. ०८/०६/२०२६ प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**संपादनातील आवश्यक जमिनींचा तपशिल**

गाव– मौ. कोऱ्हाळे तालुका– राहाता जिल्हा अहिल्यानगर

| अ. क्र. | भुमापन किंवा गट नंबर | आवश्यक जमि नीचे अंदाजीत क्षेत्र (हे. आर) | अ. क्र. | भुमापन किंवा गट नंबर | आवश्यक जमि नीचे अंदाजीत क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | गावठाण पैकी | ०.०२०० | २१ | ३५७ पैकी | ०.०२०० |
| २ | ३४६ पैकी | ०.१८०० | २२ | ३५८ पैकी | ०.०५०० |
| ३ | ३४७ पैकी | ०.०३०० | २३ | ३५९ पैकी | ०.६००० |
| ४ | ३४७ पैकी | ०.०२०० | २४ | ३६६ पैकी | ०.३८०० |
| ५ | ३४७ पैकी | ०.११०० | २५ | ३६६ पैकी | ०.४००० |
| ६ | ३४७ पैकी | ०.०३०० | २६ | ३६७ पैकी | ०.१५०० |
| ७ | ३४७ पैकी | ०.३२०० | २७ | ३८० पैकी | ०.१६०० |
| ८ | ३४७ पैकी | ०.१२०० | २८ | ३८० पैकी | ०.२६०० |
| ९ | ३४७ पैकी | ०.११०० | २९ | ३७९/३ पैकी | ०.३९०० |
| १० | ३४८ पैकी | ०.०५०० | ३० | ३७९/४ पैकी | ०.०१०० |
| ११ | ३४३ पैकी | ०.२७०० | ३१ | ३७९/५ पैकी | ०.०१०० |
| १२ | ३४९ पैकी | ०.०४०० | ३२ | ३७८ पैकी | ०.०८०० |
| १३ | ३५० पैकी | ०.०१०० | ३३ | ३७८ पैकी | ०.०४०० |
| १४ | ३५० पैकी | ०.०२०० | ३४ | ३७८ पैकी | ०.०३०० |
| १५ | ३५० पैकी | ०.०२०० | ३५ | ३७७ पैकी | ०.१४०० |
| १६ | ३५१ पैकी | ०.०५०० | ३६ | ३७७ पैकी | ०.१००० |
| १७ | ३५४ पैकी | ०.०४०० | ३७ | ३७७ पैकी | ०.१४०० |
| १८ | ३५६ पैकी | ०.०७०० | ३८ | ३७७ पैकी | ०.१६०० |
| १९ | ३५७ पैकी | ०.०४०० | एकूण | | ४.७००० |
| २० | ३५७ पैकी | ०.०३०० | | | |

सर्व हितसंबंधित यांना या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सदर संपादन क्षेत्रात त्यांचा कोणताही असलेला हितसंबंध जमिनीचे क्षेत्रासंबंधाने हरकत, मागण्या इ. बाबतचे आक्षेप जे कोणतेही असतील त्यासह, भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शिर्डी यांचे कार्यालयात दि. /०६/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात स्वतः अथवा कायदेशीर प्रतिनिधी मार्फत सादर करावेत.

संपादन क्षेत्राचे मोजणी नकाशे उपविभागीय अधिकारी शिर्डी यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत निरीक्षणासाठी उपलब्ध आहेत.

स्थळ – शिर्डी
दिनांक :–२२/०६/२०२६
क्र.कावि/एल.ए.क्यू./६/७९/२०२६

**(माणिक आहेर)**
**भूसंपादन अधिकारी**
तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी



संकल्प असावेत
नवे तुमचे मिळाव्यात
त्यांना नव्या दिशा
प्रत्येक स्वप्न पूर्ण
व्हावे तुझेह्याच
वाढदिवसाच्या
शुभेच्छा:!

# मा. डॉ. अतुलसिंग परदेशी

## इले. मिडीया प्रदेशाध्यक्ष, महा.रा.प.संघ, मुंबई

## यांना वाढदिवसानिमित्त

## हार्दिक शुभेच्छा

संस्थापक संघटक



मा.श्री.संजय भोकरे

राष्ट्रीय अध्यक्ष



मा.श्री.अशोकराव वानखेडे

प्रदेश अध्यक्ष



मा.श्री.निलेश सोमाणी

राज्य समन्वयक



श्री. नितीन शिंदे

सोशल मिडीया प्रदेश अध्यक्ष



श्री.सिध्दार्थ भोकरे

प्रदेश संपर्क प्रमुख



मा.श्री.वैभव स्वामी

इलेक्ट्रॉनिक मिडीया प्रदेश अध्यक्ष



श्री.अतुल परदेशी

आरोग्य सेल प्रदेश अध्यक्ष



मा.श्री.अमितकुमार खाडे

राज्य निवड समिती अध्यक्ष



मा.श्री.रुपेश पाडमुख

प्रवक्ते



मा.श्री.रमेश डोंगरे

सांस्कृतिक विभाग अध्यक्ष प्रदेश अध्यक्ष



श्री.संदिप भटेवरा

कायदेविषयक सल्लागार



ॲड.रचना भालके

प्रदेश प्रसिध्दी प्रमुख



मा.श्री.नवनाथ जाधव



श्री.रमजान मन्सुरी
गुजरात प्रदेश अध्यक्ष



श्री.मनिष महाजन
मध्यप्रदेश अध्यक्ष



राजश्री चौधरी
दिल्ली प्रदेश अध्यक्ष



श्री.आबा खवणेकर
गोवा प्रदेश संपर्क प्रमुख



श्री.रघुनाथ सोनवणे
दिल्ली प्रदेश संपर्क प्रमुख



मा.श्री.अशोक देढे
प्रदेश उपाध्यक्ष



मा.श्री.महेश पानसे
प्रदेश उपाध्यक्ष



मा.श्री.अभयकुमार दांडगे
प्रदेश उपाध्यक्ष



मा.श्री.किशोर रायसाकडा
प्रदेश उपाध्यक्ष

### प्रदेश कार्यकारिणी सदस्य/ विभागीय अध्यक्ष

शुभेच्छूक :-

सौ.सुरेखा खानोरे (सचिव), श्री.नितीन जाधव (मंत्रालय संपर्क प्रमुख),
श्री.नयन मोंढे (विदर्भ प्रमुख), श्री.सुनील फुलारी (अमरावती विभाग अध्यक्ष),
श्री.शैलेश पालकर (कोकण विभागीय अध्यक्ष), श्री.अनिल सावंत (मराठवाडा विभागीय अध्यक्ष),
श्री.अनुपकुमार भार्गव (नागपूर विदर्भ प्रमुख), श्री.भुवनेश दुसाने (उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष),

श्री.प्रशांत कांबळे (मुंबई), श्री.सुरेश खोसे (अहिल्यानगर), श्री.स्वामीराज गायकवाड (सोलापूर),
श्री.संग्राम मोरे (नांदेड),
श्री.स्वामी शिरकुल (मुंबई), श्री.सुभाष विसे (ठाणे), श्री.बाजीराव फराकटे (कोल्हापूर),
श्री.अनिल रहाणे (अहिल्यानगर), कु.श्रध्दा ठोंबरे (बदलापूर), श्री.पराग कुंकूलोळ (पिंपरी चिंचवड),
श्री.लक्ष्मण डोळस (नाशिक), श्री.सिताराम गावडे (सिंधूदूर्ग), श्री.अरुण लोखंडे (तुळजापूर),
श्री.शरद नागदेवे (नागपूर), श्री.रुपेश पाडमुख (नांदेड), प्रभू गोरे,
श्री.सुभाष डोके (प्रदेश का. सदस्य), श्री.राजेंद्र कोर्टे पाटील (पंढरपूर),
श्री.कुंडलिक वाळेकर (औरंगाबाद),श्री.रवींद्र गुरव (नंदुरबार), श्री.अबरार मिर्झा (जळगाव),
श्री.संतोष खालकर (सातारा), श्री.पंकज सोनवणे (वाशिम), प्रा.जसपाल सिंह सिसोदिया (धुळे),
श्री.संजोग काळदंते (पश्चिम महाराष्ट्र सचिव), श्री.नाविद अहमद (हिंगोली), विकास कदम (सातारा)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ; मुंबई

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ; मुंबई

## संघटनेचे सर्व जिल्हा पदाधिकारी, तालुकाध्यक्ष व सभासद



# डॉ. श्री. विश्वासराव आरोटे

## पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैं. स. गांवकरीचे संपादक

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे



### विसापूरच्या सरस्वती विद्यालयात दोन लाखांचे शालेय साहित्य वाटप

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : शिक्षण हीच खरी संपत्ती मानणाऱ्या आणि आपल्या शाळेचे ऋण फेडण्याची जाणीव जपणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी विसापूर येथील सरस्वती विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये एक प्रेरणादायी उपक्रम राबवत शंभराहून अधिक गरजू विद्यार्थ्यांना सुमारे दोन लाख रुपयांचे शालेय साहित्य मोफत वितरित केले. गरिबीमुळे शिक्षणाच्या वाटेवर कोणताही अडथळा येऊ नये आणि विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आर्थिक परिस्थितीची मर्यादा पडू नये, या उदात्त हेतूने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. शाळा सुरू होताच वह्या, गणवेश, दप्तर आणि इतर साहित्याच्या खर्चामुळे अनेक पालकांसमोर आर्थिक अडचणी उभ्या राहतात. हीच अडचण लक्षात घेऊन माजी विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला. माजी प्रा. नंदकिशोर कुन्हे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, वह्या, कंपास पेट्या, शालेय बॅगा आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला, तर पालकांनाही मोठा दिलासा मिळाला.

### नगरमधील विजय पठारे टोळीवर मकोका; टोळीवर कारवाई

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर शहरात खंडणी, धारदार शस्त्रांचा वापर करून परिसरात दहशत माजविणाऱ्या सराईत गुन्हेगार विजय पठारे टोळीविरोधात मकोका कायद्यानुसार सोमवारी कारवाई करण्यात आली आहे. विजय पठारे व त्याच्या टोळीविरुद्ध शहरातील कोतवाली व तोफखाना पोलीस ठाण्यांमध्ये विविध गुन्हे दाखल आहेत. या टोळीविरुद्ध धारदार शस्त्रांसह घटनापणे दरोडा टाकणे, हत्येचा प्रयत्न, हप्त्याची आदेशाचे उल्लंघन करणे, शासकीय कामात अडथळा आणणे, विनयभंग यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. टोळीप्रमुख विजय राजू पठारे रा. मुक्तेश्वर कॉलनी, सिद्धार्थनगर यांच्यासह अजय राजू पठारे, किरण मोहन जाधव, सनी रंजित चावरें या टोळीतील सदस्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तोपखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी विजय पठारे टोळीवर मकोका कायद्यानुसार कारवाई करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. निलेश बाबासाहेब ससाणे अशी कारवाई झालेल्या गुन्हेगारांचे नाव आहे. मकोका लागू झाल्याने आता या टोळीतील सदस्यांना जामीन मिळणे कठीण होणार आहे. शहरातील खंडणी व दहशतीच्या घटनांना आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाची परंपरा कायम

श्रीगोंदा (स. गांवकरी) : राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) पीसीएम व पीसीबी गटाच्या परीक्षेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण निकालाची परंपरा कायम राखली आहे. शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या ध्येय-धोरणानुसार आणि कर्मवीर करिअर अकॅडमीच्या माध्यमातून इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सीईटी, नीट आणि जेईई परीक्षांचे विशेष मार्गदर्शन वर्ग नियमितपणे आयोजित करण्यात आले. या वर्गांमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि जीवशास्त्र विषयांचे सखोल अध्यापन करण्यात आले. कर्मवीर करिअर अकॅडमी अंतर्गत दर शनिवारी चाचणी परीक्षा (टेस्ट सिरीज) घेण्यात येतात. तसेच संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित मॉक टेस्ट घेऊन विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे टक्केवारीनुसार विश्लेषण केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या तयारीची पातळी समजून घेण्यास मदत होते आणि पुढील अभ्यासाचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येते. महाविद्यालयात अध्यापनासाठी आधुनिक इंटरॲक्टिव्ह डिजिटल बोर्ड तसेच विविध संगणकीकृत सॉफ्टवेअरचा वापर करण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांना विषय समजून घेणे अधिक सोपे झाले आहे. रयत गुरुकुल पॅटर्नमुळे महाविद्यालयाचा निकाल उत्कृष्ट लागला असून याचा विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी निश्चितच लाभ होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी दिली.

### वीज पडून मृत्यू झालेल्या युवकाच्या कुटुंबाला तातडीने मदत द्या

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघातील घोडेगाव येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेकडे आमदार विक्रमदादा बबनराव पाचपुते यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. दि. २२ जून २०२६ रोजी घोडेगाव येथील अभिषेक मूलचंद दरेकर (वय २२) यांचा वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे दरेकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संबंधित प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन पंचनामा पूर्ण करावा तसेच शासनाच्या नियमानुसार आर्थिक मदत मंजूर करण्यात यावी, अशी मागणी आमदार पाचपुते यांनी सभागृहात केली. या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित यंत्रणांनी प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी व मदत प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आल्याची माहिती मिळाली. दरम्यान, अभिषेक दरेकर यांच्या निधनाबद्दल आमदार विक्रम पाचपुते यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. तसेच शोकाकुल दरेकर कुटुंबियांच्या दुःखात आपण सहभागी असल्याची भावना व्यक्त करत शासनाकडून त्यांना लवकरात लवकर आवश्यक मदत मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात योग दिन साजरा



श्रीगोंदा (स. गांवकरी) : योगसाधना भारतात प्राचीन काळापासून प्रचलित असून शरीर व मन सुदृढ ठेवण्यासाठी योग ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी केले. महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी योगगुरू प्रा. सुनील टकले यांनी विद्यार्थ्यांना योगसाधनेचे महत्त्व पटवून देत ताडासन, वृक्षासन, उत्तानासन, अर्धचक्रासन, भद्रासन, बद्धकोनासन, भुजंगासन, मकरासन, प्राणायाम व कपालभाती आदी योगप्रकारांची प्रात्यक्षिके करून घेतली. त्यांनी योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्वही विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या उपक्रमात क्रीडा शिक्षक प्रा. संजय डफळ यांनीही सहकार्य केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. कल्पना बागुल यांनी केले. क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी कल्याण मंडळ आणि एनसीसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



# दुष्काळी परिस्थितीत चारा उत्पादनास चालना

## पशुपालकांना वैरण बियाण्यांचे वाटप

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

2026 जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2026–2027 अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या चारा उत्पादन योजनेच्या माध्यमातून पशुपालकांना प्रातिनिधिक स्वरूपात वैरण बियाण्यांचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमास जिल्हा नियोजन अधिकारी, नांदेड, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय तसेच पशुधन विकास अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी पुरेशा चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी चारा उत्पादनाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच पशुपालकांनी मुरघास (सायलेज) निर्मिती व वापराला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. याशिवाय मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना अंतर्गत उपलब्ध सुविधांचा लाभ घेऊन जास्तीत जास्त पशुपालक शेतकऱ्यांनी पशुपालन व्यवसाय अधिक सक्षम व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमात उपस्थित पशुपालकांना चारा उत्पादन व पशुधन व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## खाड्या बुजवून विकास नव्हे तर पर्यावरणाचा खून - काँग्रेसचा घणाघात

ठाणे : (स. गांवकरी)



ठाण्यातील पर्यावरणदृष्ट्या अत्यंत संवेदनशील असलेल्या खाडीकिनारे, कांदळवने आणि पाणथळ जागांवर सुरू असलेल्या बेकायदेशीर भरावांविरोधात ठाणे शहर जिल्हा काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. साकेत ते आनंदनगर कोस्टल रोडच्या नावाखाली पर्यावरणाची खुलेआम हत्या सुरू असून प्रशासन मात्र मूक प्रेक्षक बनल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल पिंगळे यांनी केला आहे. खाडी परिसरातील कांदळवने ही नैसर्गिक कवचकुंडले मानली जातात. पूर नियंत्रण, जैवविविधतेचे संरक्षण आणि पर्यावरणीय संतुलन राखण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. मात्र या नैसर्गिक संपत्तीवर दिवसाढवळ्या राडारोडा, कचरा आणि गाळ टाकून भराव करण्यात येत असल्याचे चित्र समोर आले आहे. विशेष म्हणजे याबाबत वारंवार तक्रारी आणि पुरावे देऊनही प्रशासनाकडून कोणतीही कडक कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. राहुल पिंगळे यांनी म्हटले आहे की, साकेत, बाळकुम, कोलशेत, ढोकाळी, वाघबीळ, कासारवडवली, दिवा आणि आनंदनगर परिसरातील पाणथळ जागा नष्ट झाल्यास त्याचा थेट परिणाम पूरस्थितीवर होणार आहे. नैसर्गिक जलसाठे आणि पाण्याचा निचरा होणाऱ्या जागा बुजवल्यामुळे भविष्यात हजारो नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेला धोका निर्माण होऊ शकतो. काँग्रेसने या प्रकरणात संबंधित भरणी माफिया, कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

## पावसाचा जोर वाढला ,हवामान विभागाकडून मोठा इशारा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



मागील काही दिवसांपासून हर्णे आणि सोलापूर येथे रेंगाळलेल्या मान्सूनने सोमवारी मुंबई, पुणे आणि रायगड जिल्ह्यातील अलिबागपर्यंत यशस्वी घोडदौड केली. गेल्या काही दिवसांपासून तीव्र उकाड्याने त्रस्त झालेल्या मुंबई आणि पुणेकरांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. आज सकाळपासूनच मुंबई-पुण्यासह राज्यातील विविध भागात हलक्या सरी ते मुसळधार पाऊस कोसळत आहे. यंदा जून महिना संपत आला तरीही राज्यात सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे; तसंच काही भागांत अद्यापही उष्णतेच्या लाटेसदृश स्थिती कायम आहे. मात्र, सोमवारपासून मान्सूनने राज्यातील इतर भागांतही हळूहळू वाटचाल करण्यास सुरुवात केल्यामुळे पुढील काही दिवसांत तो पूर्णपणे सक्रिय होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. ८ जून रोजी हर्णे आणि सोलापूर येथे दाखल झालेल्या मान्सूनने तब्बल १४ दिवसांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर पुण्यासह अलिबाग गाठले आहे. दरम्यान, मंगळवारीही मुंबईसह पालघर आणि ठाणे जिल्ह्याला वादळी पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, मुंबईत आज हलक्या सरींना सुरुवात झाली असून पुण्यात मात्र मुसळधार पावसाची नोंद झाली आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, भायखळा, वरळी, मालाड, जोगेश्वरी आणि बोरिवलीसह संपूर्ण शहरात पावसाची संततधार सुरू आहे.

## ३ निरीक्षक, २१ सहायक निरीक्षक व ३४ उपनिरीक्षकांच्या बदल्या

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




जिल्ह्यातील महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांमध्ये नुकतेच बदल करण्यात आल्यानंतर आता जिल्हा पोलीस दलातील सेकंड अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सोमवारी (२२ जून) आदेश काढत तीन पोलीस निरीक्षक, २१ सहायक पोलीस निरीक्षक आणि ३४ पोलीस उपनिरीक्षक अशा एकूण ५८ अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर केल्या आहेत.

दरम्यान, नव्याने जिल्ह्यात आलेल्या अधिकाऱ्यांना विविध पोलीस ठाण्यांमध्ये नेमणुका देण्यात आल्या असून काही अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यकाळाच्या पार्श्वभूमीवर वर्षभर मुदतवाढ देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी तसेच पोलीस प्रशासन अधिक गतिमान करण्याच्या उद्देशाने ही बदली प्रक्रिया राबविण्यात आली असल्याचे सांगितले जात आहे. बदली झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांचे नाव, कंसात बदली ठिकाण पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ (द.वि.प. अहिल्यानगर), विजय देशमुख (जिल्हा विशेष शाखा), संतोष भंडारे (नियंत्रण कक्ष), सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर (राहुरी), सोमनाथ दिवटे (पारनेर), संदीप वसावे (नेवासा), पुनम श्रीवास्तव (कोतवाली), वर्षाबाई जाधव (जामखेड, मुदतवाढ), मंगेश गोटला (पाथर्डी), गणेश अहिरे (श्रीगोंदा, मुदतवाढ), रमीझ मुलाणी (वाचक शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय), अशोक काटे (कर्जत), गणेश जाधव (कर्जत), प्रदीप एकशिंगे (तोफखाना), शंकर मुटेकर (शेवगाव), विशाल चिटणीस (कोतवाली), रोहन खंडागळे (पाथर्डी), चेतन लोखंडे (श्रीरामपूर शहर), विकास ढोकरे (संगमनेर शहर), दीपक धनवटे (शनिशिंगणापूर), अजिनाथ कोठाळे (आर्थिक गुन्हे शाखा), नरहरी फड (आर्थिक गुन्हे शाखा), अजित मोरे (जामखेड), कल्पेशकुमार चव्हाण (शिर्डी), पोलीस उपनिरीक्षक आण्णासाहेब परदेशी (अहिल्यानगर शहर वाहतुक शाखा, मुदतवाढ), प्रवीण पाटील (तोफखाना), सुरज मेढे (संगमनेर शहर), मनोहर खिळदकर (एमआयडीसी), मनोज आहिरे (राहुरी), विलास जाधव (शेवगाव), समाधान फडोळ (आश्वी), मनोज मोंढे (नगर तालुका), शितल मुगडे (श्रीरामपूर शहर), प्रदीप बोऱ्हाडे (शिर्डी), फराहनाज पटेल (संगमनेर तालुका), शलमोन सातपुते (अकोले), आशिष चौधरी (लोणी, मुदतवाढ), रंजीत मारग (पारनेर, मुदतवाढ), सचिन लिमकर (श्रीगोंदा, मुदतवाढ), कमलाकर चौधरी (कोपरगाव तालुका, मुदतवाढ), विकास जाधव (स्थानिक गुन्हे शाखा), कृष्णकुमार सेंदवाड (स्थानिक गुन्हे शाखा), मंगेश नागरगोजे (नगर तालुका), प्रवीण महाले (घारगाव), रोशन निकम (श्रीरामपूर शहर, मुदतवाढ), विनोद खांडबहाले (शेवगाव), प्रियंका आठरे (भरोसा सेल, मुदतवाढ), गजेंद्र इंगळे (कर्जत), संदीप मुरकुटे (पाथर्डी), दीपक मेढे (कोतवाली), महादेव गुट्टे (शिर्डी), अमोल गर्जे (एमआयडीसी), समाधान सोळुंके (कोतवाली), सुहास आव्हाड (भिंगार), संदीप दरवडे (स्थानिक गुन्हे शाखा), किशोर जाधव (सोनई), गणेश आघाव (जामखेड), किरण कोठुळे (सुपा).

## अवयवदानातून रुग्णाला मिळाली नवजीवनाची नवी संधी

नाशिक : (स. गांवकरी)



अंतिम अवस्थेतील किडनी विकारामुळे नियमित डायलिसिसवर अवलंबून असलेल्या एका रुग्णाला यशस्वी किडनी प्रत्यारोपणाद्वारे नव्या आयुष्याची संधी मिळाली आहे. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे पार पडलेल्या या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे रुग्णाला डायलिसिसच्या दीर्घ आणि कष्टदायक प्रवासातून मुक्ती मिळाली असून उत्तर महाराष्ट्रातील प्रगत किडनी उपचार सेवेमधील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठण्यात आला आहे. या रुग्णाला दीर्घकाळापासून किडनी विकाराचा त्रास होता आणि त्यासाठी नियमित डायलिसिस सुरू होते. वैद्यकीय तपासण्यांनंतर किडनी प्रत्यारोपण हा सर्वोत्तम उपचार पर्याय असल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, रुग्णाच्या पत्नीने किडनी दान करण्याचा निर्णय घेतला आणि त्यानंतर संपूर्ण वैद्यकीय प्रक्रियेचे नियोजन करून यशस्वी प्रत्यारोपण करण्यात आले. याबाबत माहिती देताना डॉ. विपुल गट्टाणी, वरिष्ठ नेफ्रॉलॉजिस्ट म्हणाले, "किडनी निकामी झाल्यानंतर अनेक रुग्णांना नियमित डायलिसिसवर अवलंबून राहावे लागते. मात्र योग्य दाता उपलब्ध झाल्यास किडनी प्रत्यारोपणामुळे रुग्णाचे जीवनमान लक्षणीयरीत्या सुधारते. आज प्रत्यारोपणानंतर रुग्णाची प्रकृती चांगली असून त्यांना अधिक सक्रिय आणि स्वतंत्र जीवन जगण्याची संधी मिळणार आहे." डॉ. अभिजित मोरे यांनी सांगितले, "किडनी प्रत्यारोपण ही केवळ शस्त्रक्रिया नसून त्यामध्ये रुग्ण, दाता आणि वैद्यकीय टीम यांचा एकत्रित प्रवास असतो. योग्य नियोजन, सातत्यपूर्ण फॉलोअप आणि शस्त्रक्रियेनंतरची काळजी यामुळे उत्कृष्ट परिणाम साध्य होतात. या प्रकरणात रुग्णाची सुधारणा समाधानकारक आहे."

अवयवदानाबाबत जनजागृतीचे महत्त्व अधोरेखित करताना डॉ. किशोर वाणी म्हणाले, "भारतात अजूनही अवयवदानाची गरज आणि उपलब्धता यामध्ये मोठी तफावत आहे. योग्य माहिती आणि जनजागृतीमुळे अनेक रुग्णांना वेळेत उपचार मिळू शकतात. अवयवदान ही समाजासाठी अत्यंत मौल्यवान देणगी आहे." या यशस्वी उपचारामागील टीमवर्कविषयी बोलताना डॉ. श्याम तलरेजा यांनी सांगितले, "किडनी प्रत्यारोपणासारख्या जटिल प्रक्रियेमध्ये नेफ्रॉलॉजिस्ट, सर्जन, ॲनेस्थेशिया तज्ज्ञ, क्रिटिकल केअर टीम आणि नर्सिंग स्टाफ यांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा असतो. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेल्या बहुविशेषज्ञ सेवांमुळे अशा उपचारांमध्ये सातत्याने यश मिळत आहे."

या प्रसंगी उपस्थित असलेले डॉ. विजय कराडे, वरिष्ठ फिजिशियन तथा अध्यक्ष, नाशिक रोड फिजिशियन असोसिएशन यांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन करताना सांगितले, "अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल सातत्याने प्रगत वैद्यकीय सेवा, शैक्षणिक उपक्रम आणि Quaternary Care सुविधांच्या माध्यमातून नाशिकच्या आरोग्यसेवेला नवे आयाम देत आहे. किडनी प्रत्यारोपणासारख्या जटिल उपचारांचे यशस्वी व्यवस्थापन हे नाशिकसाठी अभिमानाची बाब आहे.

## शेतकऱ्यांचा एल्गार मुंबईत धडकणार!

नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक रिंग रोड प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ उद्या मुंबईतील मुख्यमंत्री निवासस्थान 'वर्षा' येथे रिंग रोड बाधित शेतकरी सहकुटुंब, सहपरिवार शांततापूर्ण आंदोलन करून मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांच्याकडे न्यायाची मागणी करणार असल्याची माहिती छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी दिली.

करण गायकर म्हणाले की,रिंग रोड बाधित शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मा.मंत्री गिरीश महाजन यांच्याशी अनेक वेळा सकारात्मक चर्चा झाली होती.त्यांनी विधान परिषदेच्या आचारसंहितेनंतर नाशिक जिल्ह्यातील संबंधित मंत्री,शासकीय अधिकारी आणि रिंग रोड बाधित शेतकरी प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र,आचारसंहिता संपल्यानंतरही त्यांच्या कार्यालयातील दोन्ही OSD यांच्याशी वारंवार संपर्क साधूनही बैठकीबाबत कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

ते पुढे म्हणाले की,आमचा विकासाला अजिबात विरोध नाही. नाशिकचा विकास व्हावा,रस्ते व्हावेत,पायाभूत सुविधा उभारल्या जाव्यात,हीच आमची भूमिका आहे.मात्र विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या पिढ्यानपिढ्या कसलेल्या जमिनी कवडीमोल भावाने संपादित करणे,चुकीच्या पद्धतीने अलाइनमेंट बदलणे आणि काही बिल्डर,व्यापारी,राजकीय पुढारी किंवा अधिकाऱ्यांच्या फायद्यासाठी सर्वसामान्य शेतकऱ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करणे,हे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही.

## वर्तमानपत्र विक्रेत्याची मुलगी अनघा झाली (MBBS) डॉक्टर

ठाणे : (स. गांवकरी)



आपल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत वर्तमानपत्र विक्रेत्याची मुलगी अनघा ही एम. बी. बी. एस. परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली आहे. कल्याण शहरातील गणेश टॉवर, छत्रपती शाहू महाराज चौक, श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिर परिसरातील वृत्तपत्र विक्रेते (पेपरवाले) सौ. मंगल व श्री. विलास कांगणे याची मुलगी अनघा विलास कांगणे हिने एमबीबीएस परीक्षा ६६% गुणांसह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ. अनघा कांगणे हिचे सर्व स्तरांतून भरभरून अभिनंदन व कौतुक केले जात आहे. कल्याण शहरात वर्तमानपत्र विक्रीचा व्यवसाय करणारे विलास कांगणे आपल्या मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी नेहमी अग्रेसर राहिले असून त्यांनी आपल्या मुलाला इंजिनियर तर पत्नीने नुकतेच वकिली (LLB ) चे शिक्षण पूर्ण केले असून त्यांनी आपल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षण दिल्याने सर्व स्तरावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## त्रुटीची पूर्तता करण्यासाठी अंतिम मुदतवाढ

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना अंतर्गत सन 2024-25 व 2025-26 मधील प्रलंबित (Send Back) अर्जातील त्रुटीची पूर्तता करण्यासाठी मंगळवार 30 जून 2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी या योजनेच्या लाभ घेण्यासाठी त्रुटीची पूर्तता करावी, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

अनुसूचित जातीतील जे विद्यार्थी 50 टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत व ज्या विद्यार्थ्यांना समाज कल्याणच्या शासकीय वस्तीगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना राबवली जात आहे. योजना ही जिल्हा तसेच तालुका स्तरावर राबविण्यात येत असून जे महाविद्यालय महानगरपालिकेपासून पाच किलोमीटरच्या आतमध्ये व नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत तसेच तालुक्याच्या हद्दीत असलेले महाविद्यालयातील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांनी सन २०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात त्रुटी अभावी प्रलंबित असलेले अर्ज असल्यास विद्यार्थ्यांनी आपल्या अर्जाची सद्यस्थिती तपासण्यासाठी https//hmas.mahait.org या संकेतस्थळावर जाऊन आपला यूजर आयडी व पासवर्ड टाकून आपल्या अर्जाची सद्यस्थिती पहावी.

अर्ज Send Back मध्ये असेल तर विद्यार्थ्यांनी तात्काळ आपल्या त्रुटीची पूर्तता व्यवस्थितरित्या परिपूर्ण कागदपत्रासह करण्यासाठी मंगळवार 30 जून 2026 पर्यंत संधी देण्यात आली आहे. योजनेअंतर्गत प्राप्त अर्जांची छाननी सुरू असून अनेक अर्जामध्ये आवश्यक कागदपत्रांची कमतरता किंवा तांत्रिक त्रुटी आढळून आले आहेत. स्वाधार योजनेच्या माध्यमातून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य मिळत असल्याने या मुदत वाढीचा लाभ घेऊन पात्र विद्यार्थ्यांनी आपल्या अर्जातील त्रुटी दूर कराव्यात.

मुदतवाढ ही शेवटची असेल व यानंतर आपला अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची दक्षता विद्यार्थ्यांनी घ्यायची आहे. आपल्या रजिस्टर मोबाईल क्रमांकावर सदरील मॅसेज आल्यानंतर तत्काळ स्वाधारला अर्ज करायचा आहे. जर आपला अर्ज Approved असेल तर आपल्या बँक खात्याची माहिती त्या ठिकाणी योग्यरीत्या भरायचे आहे. आपले बँक खाते क्रमांक हे आधार संलग्न असणे आवश्यक आहे.

प्रस्तुत कार्यालयाअंतर्गत समाज कल्याण कार्यालयाचे अधिकृत सोशल मीडियाचे पेज इंस्टाग्राम व फेसबुक पेज samajkalyannanded याला फॉलो करून आपल्या येणाऱ्या अडचणीबाबत वेळोवेळी त्याच्यावर देण्यात आलेली माहिती पहावी व आपल्या शंकेचे निरसन करावे. बाहेर इतर कुठल्याही अनाधिकृत ग्रुप किंवा व्यक्तीशी संपर्क न साधता थेट समाज कल्याण कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांना येऊन आपल्या समस्या बद्दल विचारणा करावी, असेही आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी विद्यार्थ्यांना केले आहे.